आरोग्य सेवा
# जिल्हा रुग्णालय रत्नागिरी
## वस्त्रभांडार

• दूरध्वनी : (०२३५२) २२१३७१
• ईमेल : cpomedstore@gmail.com

जा.क्र.जिशचिर/वस्त्रभां/12379 /२०१७
जिल्हा शल्य चिकित्सक रत्नागिरी यांचे कार्यालय,
दिनांक :- २७/०७/२०१७

प्रति,

मा. सहसंचालक (खरेदी),

आरोग्य सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य

आरोग्य भवन, मुंबई - ४०० ००१.

विषय : दरपत्रका संबंधीची जाहिरात आरोग्य सेवा संचालनालयाच्या संकेतस्थळावर (website) प्रसिध्द करणे बाबत.

संदर्भ : शासन निर्णय दि.३०.१०.२०१५ व ०१.१२.२०१६

महोदय,

उपरोक्त विषयी संदर्भिय शासन निर्णयानुसार, जिल्हा रुग्णालय रत्नागिरी या रुग्णालयाच्या अंतर्गत असलेल्या शासकीय चतुर्थश्रेणी कर्मचारी यांच्या गणवेश कापड खरेदी करीता दरपत्रके मागवीण्यात येत आहेत. महाराष्ट्र शासन, उद्योग उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रं भांखस -२०१४/प्र.क्र.८२/भागप्प/उद्योग - ४,दिनांक ०१ डिसेंबर २०१६, नियम ३:२:३ नुसार दरपत्रके मागविण्याची सुचना संबधित विभागाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करणे बंधनकारक आहे. कृपया दरपत्रके मागविण्याची सुचना आरोग्य सेवा संचालनालयाच्या संकेतस्थळावर (website) प्रसिध्द करावी ही विनंती. सोबत जाहीरात प्रसिध्द करावयाचा मराठी मजकुराचा नमुना व यादी सादर करीत आहोत.

आपला विश्वासू,

जिल्हा शल्य चिकित्सक, रत्नागिरी.

आरोग्य सेवा

# जिल्हा रुग्णालय, रत्नागिरी

## वस्त्रभांडार

- दूरध्वनी : (०२३५२) २२१३७१
- ईमेल : cpomedstore@gmail.com

जा.क्र.जिशचिर/वस्त्रभां/ 12979 /२०१७
जिल्हा शल्य चिकित्सक, रत्नागिरी यांचे कार्यालय,
दिनांक :- २७/०७/२०१७

# जाहीर नोटीस

सुचित करणेत येते की, जिल्हा शल्य चिकित्सक रत्नागिरी कार्यालयामार्फत सन २०१७-१८ मध्ये जिल्हा रुग्णालयातील शासकीय चतुर्थश्रेणी **कर्मचाऱ्यांच्या गणवेष कापड** खरेदीकरीता सोबत जोडलेल्या यादीतील कापड खरेदी करणेकामी दरपत्रके मागविण्याचे निश्चित केले आहे. त्याकरीता सोबत जोडलेल्या यादीत कापडाची प्रत निश्चित केली आहे . इच्छुकांनी सादर यादीचे अवलोकन करावे.

.................................................................................

## दरपत्रके सादर करण्याच्या सर्वसाधारण अटी व शर्ती -

१. इच्छुकांनी वरील लागणारे **गणवेष कापडाचे** दर, स्वतंत्रदरपत्रके सिलबंद लिफाफा मध्ये सादर करावीत. प्रत्येक निविदाधारकास फक्त एक दरपत्रक देण्याची परवानगी आहे.

२. दरपत्रकासोबत नोंदणी प्रमाणपत्र ( Licencs) जोडणे आवश्यक.

३. दरपत्रकांचे दर नमूद करताना कापडाची प्रत,रंग,कापडाची साईझ (पन्हा) व उत्पादित कंपनीचे नाव नमूद करणे आवश्यक आहे.

४. पूर्वानुभव दाखला (एक्सपिरीयंन्स सर्टिफिकेट).

५. आयकर भरल्याचे प्रमाणपत्र (इन्कम टॅक्स क्लिअरंस सर्टिफिकेट).

६. पॅन कार्ड

७. संस्था/ दुकान, उपकरणे उत्पादन/ विक्री विषयक नोंदणी दाखला

८. **दरपत्रके.पोहोच करणेचे ठिकाण : जिल्हा शल्य चिकित्सक, रत्नागिरी** कार्यालयात कामकाजाच्या वेळेत (सुट्टी वगळता) दि.०७.०८.२०१७ ( ५.०० वाजेपर्यंत)

९. यादीमधील कापड **आवश्यकतेप्रमाणे खरेदी** केले जाईल.

१०. ठरवुन दिलेलया कालावधीत गणवेष कापडाचा पुरवठा न झाल्यास नियमानुसार दंडात्मक रक्कम

पुरवठादाराच्या देयकातून रक्कमेतून  वसूल केली जाईल.

११. दरपत्रक  मंजूर झाल्यानंतर पुरवठा केलेल्या मालाच्या बिलामध्ये  आपला  Liciennce no पॅन कार्ड क्रमांक लिहावा. तसेच आयकर , GST इ. नियमानुसार जे कर लागू असतील ते भरण्याची जबाबदारी दरपत्रकधारकाची राहील.

१२. मंजूर  दरपत्रकामधील गणवेष कापडाचा पुरवठा करणे  आपणांस शक्य झाले नाही व त्यामुळे  वाढीव दराने बाहेरुन खरेदी करावी लागली तर निविदेतील मंजूर दर व वाढीव दर या मधील फरकाची रक्कम आपल्याकडून वसूल करण्यात येईल.

१३. सदर दरपत्रकामधील गणवेष कापडाचा पुरवठा हा हॉस्पिटल पर्यंत आणून पोहोच करावा.

१४.सोबत जोडलेल्या  यादीतील आपण पुरवू शकणा-या कापडाचे दर देणे बंधनकारक आहे. तसेंच दर MRP /DPCU पेक्षा जास्त असू नये तसेच गणवेष कापडांचा दरांबाबत राज्य शासन/ केंद शासनाचे सर्व शासन निर्णय व परीपत्रके पालन करण्याची सर्व जबाबदारी दरपत्रक धारकाची राहील.

१५. गणवेष कापड नामांकित कंपनीची असावीत व निविदा  भरतेवेळी उत्पादित कंपनीचे नाव लिहीणे आवश्यक आहे.

१६. गणवेष कापड  खरेदीवेळी  आवश्यक त्या गरजेनुसार खरेदी करण्यात येईल सर्व कापड यादीनुसार खरेदी करणे या कार्यालयावर बंधनकारक नाही.

१७. एखादे  कापड  खराब व कमी आढळल्यास ते नवीन बदली  करुन देणे हे पुरवठादारावर बंधनकारक राहील.

१८. यादीमध्ये नमूद करण्यात आलेले गणवेष कापड  हे मागणीनुसार त्वरीत पुरवठा करण्यात यावे. जुना व कमी प्रतिचा कापड पुरवठा करु नये.

१९. निश्चित  केलेल्या दराप्रमाणेच  देयके तीन प्रती ए-४ साईज मध्ये सादर करावीत

२०. पुरवठा केलेल्या गणवेष कापडाची देयके अनुदानाच्या उपलब्धतेनुसार अदा केली जातील.

२१. दरपत्रके स्विकारण्याची मुदत नोटीस प्रसिध्दी दिनांकापासून सात दिवस  उशिरा प्राप्त होणा-या  दरपत्रकांचा विचार केला जाणार नाही.

२२. दरपत्रके उघडण्याची तारीख : ०८.०८.२०१७ ( दु ४.०० वा.) किंवा या कार्यालकयाकडील नोटीस बोर्डावर प्रसिध्द करणेत येईल.

२३. दरपत्रकासोबत जोडण्यांत येणारी सर्व कागदपत्रे राजपत्रित अधिकरी किंवा शासनाने प्राधिकृत केलेल्या अधिका-यांकडून साक्षांकित करुन सादर करावीत. व सोबत तसेच दरपत्रकधारकाचे दर मंजूर होतील त्याने मंजुर दिनांकापासून १५ दिवसात १००००/- रु चा Demand Draft In Favor of Administrative Officer , Civil Hospital , Ratnagiri सादर करावा.

२४. कोणतेही कारण न देता कोणतेही दरपत्रके स्विकारण्याचा किंवा नाकारण्याचा किंवा प्रक्रिया स्थगित ठेवण्याचा अधिकार जिल्हा शल्य चिकित्सक, रत्नागिरी यांनी राखून ठेवला आहे.त्यासाठी कोणतेही तोंडी अथवा लेखी कारण दिले जाणार नाही अगर पत्रव्यवहार केला जाणार नाही. दरपत्रकाचा कालावधी १८० दिवसांचा असेल .

आदेशावरुन,

सही/- जिल्हा शल्य चिकित्सक, रत्नागिरी.

आरोग्य सेवा

# जिल्हा रुग्णालय, रत्नागिरी

## वस्त्रभांडार


- दूरध्वनी : (०२३५२) २२१३७१
- ईमेल : cpomedstore@gmail.com


जा.क्र.जिशचिर/वस्त्रभां/ ~~स्वतपेढी~~ 12379 /२०१७
जिल्हा शल्य चिकित्सक, रत्नागिरी यांचे कार्यालय,
दिनांक :- २७/०७/२०१७

### दरपत्रकाकरीता शासकीय कर्मचारी गणवेष कापडाची यादी.

| अ.क्र. | कापडाचा प्रकार | कंपनीचे नाव | दर |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १ | पांढरे टेरीकॉट सुटींग व शर्टींग कापड ६७% पॉलिस्टर ३३% व्हिसकॉस | | |
| २ | खाकी टेरीकॉट सुटींग व शर्टींग कापड ६७% पॉलिस्टर ३३% व्हिसकॉस | | |
| ३ | टेरीकॉट साडी-सहावारी (५.५० मी.)६७% पॉलिस्टर ३३% कॉटन पांढरी- निळी बॉर्डर | | |
| ४ | टेरीकॉट साडी-सहावारी (५.५० मी.)६७% पॉलिस्टर ३३% कॉटन निळी- काळी बॉर्डर | | |
| ५ | उत्तम प्रतिचे टेरीकॉट पांढरे व निळे ब्लाऊज ६७% पॉलिस्टर ३३% कॉटन | | |
| ६ | उत्तम प्रतिचे पांढरे कॉटन पेटीकोट कापड | | |

जिल्हा शल्य चिकित्सक, रत्नागिरी.